# निशांत

भाग - ६

## जीवनोपयोगी ज्ञान

# *निशांत - भाग ६*

फेब्रुवारी २०००

संपादक / प्रकाशक
महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ
नाशिक - ४२२ ००२

लेखन व संकलन सहभाग

सखाराम गावित  अर्जून दारोळे
पोपट बोर्डे  यादव माघाडे
लुकस दिवे  ब्रायनभाऊ

कला सजावटः गॉडफ्री डिलीमा

कम्पुटर मुद्रणः लुकस दिवे

(खाजगी वितरणासाठी)

# नि शां त

भाग - ६

# आमचे मनोगत

" निशांत " ची ही पहिली मालीका गावातल्या तळा गळातील युवक - युवतींसाठी लिहिली जात आहे. प्रत्येक गावामध्ये अशा व्यक्ति आहेत की ज्यांना सामाजीक कारणास्तव औपचारिक शिक्षणातून बाहेर पडावं लागतं किवां बाहेर ढकललं जातं. परंतु ह्यांपैकी अनेक जन आशा बाळगतात की स्वतःच्या पायावर उभे राहून स्वावलंबी जीवन जगावं. ह्यां इच्छूक व्यक्तिनां "निशांत" आम्ही समर्पीत करतो.

जीवन उपयोगी ज्ञान स्वावलंबनाच्या वाटेवर पहिली पायरी आहे. असे ज्ञान आपल्या भागातल्या सोप्या व प्रचलित भाषेत सादर करण्याचा हा आमचा प्रयत्न आहे. ही मालिका वापरणाऱ्या प्रत्येक व्यक्तिची ज्ञानचिकित्सा उफाळून यावी जेणेकरून आणखी ज्ञान प्राप्त करण्यास त्यांचे धाडस वाढावे व स्वतःचे भविष्य आपल्याच हाताने घडवता यावे, हीच आमची मनिषा.

ज्ञानाचा शोध घेण्यास आम्हाला ही अनमोल संधी लाभली म्हणून आपले चिकित्सक बंधु-भगिनींना शतशः धन्यवाद. तसेच ह्या पुस्तकांचा मालिकेच्या उगम काळापासून म. प्र. से. मंडळाचे संचालक, ब्रायनभाऊ, ह्यांचा पाठींबा व मार्गदर्शन लाभले, तसेच म. प्र. से. मंडळाचे अनेक विस्तार अधिकाऱ्यांचे सहाय्य व सहकार्य लाभले. नाहीतर हे स्वप्न अधुरे राहीले असते, यात तीळ मात्र शंका नाही; या सर्वांना मनापासून धन्यवाद !

संपादक मंडळ

# अनुक्रमणिका

गद्य विभाग:
१. आदिवासी १
२. आंबा ३
३. बाजार ७
४. सप्तशृंग गड ९
५. तुळस ११
६. ढोल वाजला १४
७. सात बारा उतारा १५
८. डोकं चालवा १९
९. दस्त २०
१०. सहकार २२
११. घुबड २४
१२. निंबोळी पेंड २८
१३. यात्रा ३१
१४. कंपोष्ट खत ३३
पद्य विभाग
१. दारुची बाटली ३६
२. पाणी आडवायच ३७
३. बंधुप्रिती ३८
४. पाणी आडवायचं ३९
५. डोंगराच्या आड ४०

धडा १ ला.

# आदिवासी

संकलनः अ. द. दारोळे.

मागील पाठात आपण आदिवासी म्हणजे काय ? ते निसर्गाशी कसे एकरुप झाले ? त्यांचे जीवन, रामायण व महाभारत या मध्ये असलेला त्यांचा उल्लेख इत्यादी पाहीले. या पाठात आदिवासींची ठळक वैशिष्ट्ये कोणती आहेत ते पाहू.

१) आदिवासी समाज ज्या भूप्रदेशात रहातो तो भाग इतर प्रगत समाजाच्या भूप्रदेशापेक्षा लहान व प्रगत समाजापासून दूर जंगलात असतो.


२) आदिवासी लोक लहान लहान गटात रहातात हे गट नाते संबंधावर अवलंबून असतात.

३) आदिवासी जमातीची स्वतंत्र पंचायत असते. या समाजाचे नियंत्रण पंच किंवा मुखीया करतो.

४) आदिवासी जमातीची स्वतंत्र बोली भाषा असते.

५) आदिवासींची धर्मक्षेत्रे त्यांच्या निवासस्थानापुरती असतात. त्यांची तीर्थक्षेत्रे त्यांच्या भागातच असतात.

६) आदिवासी लोक सर्व प्रकारची कामे करतात. अर्थव्यवस्थेत उत्पन्नाची साधने प्राथमिक स्वरूपाची असतात. अर्थव्यवस्थेत उत्पादन-वितरण-सेवन या तीन टप्प्यापैकी वितरण म्हणजे मालाची व उत्पन्नाची देवाण-घेवाण आदिवासी अर्थव्यवस्थेत होत नाही. उत्पन्न कमी असल्यामुळे बाजारपेठ या भागात नसते. उत्पन्नाची साधने-पाटावरवंटा, सापळे, जाळी, आकडे, गळ, दोऱ्या, टोकदार व धारदार दांडके, हातोडा, कोयता इत्यादि होय.



७) आदिवासी समाजात परंपरेला प्राधान्य असते. परंपरेचा ठेवा एक पिढी दुसऱ्या पिढीला कथा, काव्य, नृत्य, इत्यादी माध्यमाद्वारे देतात.

८) धर्मात निसर्गपुजेस (भाया, डोंगरदेव, वाघबारस इ.) जास्त महत्व देतात.

९) आदिवासी समाजात परंपरा व सामाजिक नियंत्रण यावर भर असल्याने सर्व लोकांच्या वागण्यात सारखेपणा असतो. दैनंदिन व्यवहार सारखे असल्याने त्यांच्या सवयी व चालीरीती सारख्या असतात.

जगातील सर्व समाज पूर्वी आदिवासी अवस्थेत होते. पुढे ते ग्रामीण समाज झाले. नंतर राज्यसंस्था आल्यावर राजधान्या व व्यापारी पेठा झाल्या त्यामुळे नागरीकरणास प्रारंभ झाला. औद्योगिक क्रांतीनंतर संपूर्ण नागरीकरणाच्या दिशेने मानवी समाज वाटचाल करू लागले आहेत. त्यामुळे आधुनिक काळात निर्जमातीकरणाची प्रक्रिया सुरु होऊन आदिवासी समाजाचे ग्रामीण समाजव्यवस्थेत रूपांतर होऊ लागले आहे.

(क्रमशः)

पुढील अंकात आदिवासी अर्थव्यवस्था कशी ते पाहू.

धडा २ रा.

## आंबा

लुकस दिवे.

गोंदे गावाच्या पूर्वेला दमनगंगा नदी वहाते. नदिच्या काठावर सखारामची जमिन आहे. सात एकर जमिनीपैकी चार एकर भाताचे आवण तर उरलेल्या भागात नागली होते. गावात बंडींगची स्कीम आली. सखारामने शेतात बंडींग करुन घेतले. बंडींग केल्यावर काही भागात मुरूम वर आला लोक हसू लागले. नागली तरी पिकत होती येथे पण आता काय पीकलं इथं उपहासाने लोक बोलू लागले. मुरमाड जमिनीच्या तुकड्यात कोणते पीक घ्यावे याच विचारात सखाराम सुद्धा पडला. बंडींग करुन नाराज झाला. नाहीपेक्षा त्या तुकड्यात नागली पिकायची ती सुद्धा पिकणार नाही. काय करावं सुचेना. शेजारी चौधरीचा मळा. मळा पहायला फलोद्यानचे माघाडे साहेब आले. मळा पहात असतांना बंडींग झालेल्या सखारामच्या जमिनीवर त्यांची नजर गेली. ते तडक सखारामच्या झापावर गेले.

सखारामः या भाऊसाहेब या .(खाटेवर घोंगडी बसायला टाकतो)

साहेबः बंडींग यांदाच केली ना ?




सखाराम: हो, पण आता या तुकड्यात कोणतं पिक येणार ?

साहेब: तु यात आंबे का लावत नाहीस ?

सखाराम: आंबे लावून काय फायदा ? दहा पंधरा वर्ष उत्पन्न मिळणार नाही. तसेच उन्हाळ्यात झाडे जळून जातील.

साहेब: सखाराम बघ, सध्या दोन तीन वर्षे तुला या तुकड्यात पीक घेता येणार नाही. असाच पडून राहू देण्यापेक्षा आंबे तरी लाव. कलमी आंबे लावली व चांगली काळजीघेतली तर चार-पाच वर्षात फळे येतील.



सखाराम: कलमी आंबे आणायची कुठून ? शिवाय ते महाग असणार व माझ्यासारख्या गरीबाला ते कसं परवडणार ?

साहेब: फलोद्यान विभागातर्फे मी तुला आंब्याची ५० रोपे देतो. मात्र तू ३बाय ३ चे खड्डे करायला हवेस.

सखाराम: पण साहेब ५० रोपांचे किती पैसे होतील ?

साहेब: त्या रोपांबद्दल तुला सरकार सबसीडी देईल, मात्र तू त्यांची काळजी घ्यायला हवी. सखारामची डोशी (बायको) चहा साहेबांना देते व नवऱ्याला म्हणते-

डोशीः आहो घेवू की रोप. पोरंप्रमाणे सांभांळू त्यांना आपण.

सखारामः पन्नास नको यंदा दहाच रोपं द्या साहेब.

साहेबः अरे दहा रोपं घेशील व त्यापैकी पाच सहा मेली तर ? त्या पेक्षा ५० रोपे घे. नाहीतरी तुझा जमिनीचा तुकडा पडूनच रहाणार ना ? मग काय हरकत आहे प्रयत्न करायला.

सखारामः ठीक आहे तुम्ही म्हणता तर करतो. खड्डे कसे व किती अंतरावर घ्यायचे ते सांगा मला भाउसाहेब.

साहेबः (खड्ड्याचे माप समजावून सांगतात) बाई मी वचनाचा पक्का आहे. तुम्हीच सांगा खड्डे पंधरा विस दिवसांत तयार ठेवणार का ?

डोशीः भाऊसाहेब आजपासूनच आम्ही कामाला सुरवात करतो. जमलं ना रं डवऱ्या ?

सखारामः साहेब वीस एक दिवसांनी तुम्ही या पहायला. (साहेब आपल्या पुढील कामासाठी निघून जातात.)



डोशी डवर दोघेहीकामाला लागतात. तसेच दोन्ही पोरंही कामाला लागतात. भाऊसाहेबांनी सांगीतल्याप्रमाणे डोशीने गायी बैलाचे शेण, मुत्र, चारा, काडीकचरा साठवून शेणखत बनविले होतेच. १६ जुनला सखाराम ५० रोपे घेवून आला. त्याने प्रत्येक खड्ड्यात माती शेनखत मिसळून रोपे लावली. वर्ष दोन वर्ष डोशीने पोरांच्या मदतीने नदिवरून पाणी आणून झाडं जगवली. चौथ्या वर्षी झाडांना मोहर आला. मात्र डोशीने मोहर छाटून टाकला. पाचव्या वर्षी झाडं चांगलेच पोसले व भरपुर मोहराने बहरले . डोशीचे मनसुध्दा मोहराच्या वासाने सुखावले. आता झाडाला आंबे लागले व त्याच्या वजनाने झाडं जमिनीपर्यंत वाकली. फळं गारसल्यावर अढीत ठेवून पिकविली. करंजाळीच्या बाजारात व पेठच्या बाजारात डोशी व पोरे आंबे विकू लागली. गाडीभाड्याचा व इतर खर्च वगळता नऊ हजार रूपये शिल्लक राहीले. तसेच माघाडे साहेब दरवर्षी येऊन झाडाची पहाणी करीत असे. त्यांनीही चार वर्षात टप्प्याटप्प्याने सबशीडी मिळवून दिली. डोशीने हे पैसे डवऱ्याला सांगुन करंजाळीच्या बँकेत ठेवले. डोशीने डवऱ्याला विचारले आपण शेजारच्या चौधरीसारखे लिफ्ट करू शकतो का ? डवऱ्याने विचार केला. नदितुन पाणी उचलण्याचा डोशीचा विचार त्याला पटला. त्याने यंदा लिफ्टच प्रकरण केले ते आंब्याच्या जोरावरच. सखारामचे शेत पाहून गावातील इतरांनी सुध्दा आंब्याची लागवड केली. गोंदे गावात आंब्याच्या बागा फुलू लागल्या.

चर्चाः आपल्या गावात आंबराई आहे का ?

कोणत्या जातीचे आंबे तेथे आहेत ?

कलमी आंबे आपण लावतो का ?

फलोद्यान विभागाकडून कोणीकोणी फळझाडे घेतली ?

फळझाड घेतल्यावर आदिवासींना किती टक्के सबसीडी मिळते ?

घोषणाः शेता बांधावर फळझाडे लावा

धडा ३ रा.

## बाजार

वाय.जे.माघाडे.

दिंडोरी तालुक्याच्या पश्चिमेला साधारण ४० कि.मी. अंतरावर चिकाडी हे छोटेशे गाव. गाव कसला २५ ते ३० घराचा पाडाच म्हणा ना .चारही बाजूंनी डोंगर व घनदाट जंगल. अशा दुर्गम भागात शनिवारी मोठा आठवडे बाजार भरतो. हा बाजार दिंडोरी, पेठ व सुरगाना अशा तिन्ही तालुक्याच्या सिमेवरील लोकांस मध्यवर्ती आहे.या बाजारात आजूबाजूच्या गावातील लोक एकत्र येतात. धान्य, भाजीपाला, कपडे व इतरवस्तू विक्रीसाठी येतात. आजूबाजूंच्या शेतकऱ्यांनी पिकविलेला भाजीपाला व धान्य यांच्या विक्रीची व्यवस्था या टिकाणी झाली आहे. मोलमजूरी करणारे शेतकरी व शेतमजूर यांना या बाजाराचा फायदा झाला आहे.

येथे कपडे, भाजीपाला, बोंबील व सुक्के मासे हे तर असतेचं पण गावातील कारागिरांनी तयार केलेल्या वस्तू, टोपल्या, सुप, शिरई, कासरे, विळे, कुऱ्हाडी या शेतकऱ्यांना नेहमी लागणाऱ्या वस्तुची खरेदी विक्री होते. या बाजाराचे दुसरे महत्व असे की या दुर्गम भागातील लोकांना खाजगी डॉक्टर या दिवसी उपस्थित राहून वैद्यकीय सेवा पुरवितात, लोकांची फार मोठी अडचण या द्वारे दूर होते.



त्यांना उपचारासाठी दूर जावे लागत नाही. या दिवशी डॉक्टरांकडे आजारी लोकांच्या रांगा लागतात. आजूबाजूच्या गावातील लोक एकत्र जमत असल्याने सामाजिक स्वरूपाच्या देवघेवीचे अनेक व्यवहार पार पडतात. आजूबाजूचे सर्व नातेवाईक एकत्र जमत असल्याने एकमेकांची खुशाली विचारली जाते. महत्वाचे निरोप व विविध घटनांची माहीतीची देवाण घेवाण होते.

बाजाराच्या दिवशी मजुरांना व शेतकऱ्यांना सुट्टी असते. याच दिवशी मजुरांचे पगार दिले जातात. ग्रामीण भागातील लोक या दिवशी नविन कपडे घालून गावातील लोक विशेषेकरून महिला गटागटाने बाजाराच्या ठिकाणाकडे जातांना दिसतात. बाजाराच्या ठिकाणाला यात्रेचे स्वरूप आलेले असते.

चर्चाः आपण बाजाराला जाता का ?

आपल्या गावात बाजार भरतो का ?

आपल्याला कोणत्या गावी बाजाराला जावे लागते ?

आपण जाता तो बाजार कशा करीता प्रसिद्ध आहे ?

बाजारावर नियंत्रण कोणाचे असते ?




धडा ४ था.

## सप्तशृंग गड

वाय.जे.माघाडे

या पूर्वी आपण गडाचे निर्सगाशी असलेले सख्य पाहिले. चोहोबाजूंनी घनदाट वनराईत वसलेला गड पहाताच श्रमलेल्या मनाला शांती मिळते, कवी मनाला नवचैतन्य व नवप्रेरणा मिळते, आणि भक्तगणाला पापमुक्ती मिळते. तसेच गडाच्या परिसरात असंख्य वनौषधी आहेत. असा सर्वस्वाचा ठेवा गडावर असल्याने वर्षभर लोक भारतातील वेगवेगळ्या भागातून येथे सतत येत रहातात.

नांदूरीतून गडावर जाण्यासाठी खास एस.टी.ची (मिनी बसची) सेवा वर्षभर चालू असते. नांदूरीपासून गडावर जाणारा आणखी एक मार्ग म्हणजे पायी. काही भक्त पायी तर कोणी गाडीने गडावर येतात. गडाच्या दक्षिणेकडुन इ.स.१८ व्या शतकात सरदार दाभाडे यांनी डोंगर कोरून पायऱ्यांचा रस्ता तयार केला होता. मात्र अलीकडे त्याचा वापर होत नाही.



गडावरील पवित्र तिर्थः श्री सप्तशृंग गडावर एकून १०८ तीर्थे होती असे म्हणतात. परंतू सध्या फारच थोडी तीर्थे उरलेली दिसतात. सिद्धेश्वर मंदिराजवळ शिवतीर्थ आहे. यालाच गिरीजातीर्थ असेही म्हणतात.

या ठिकाणी स्नान केल्याने सर्व पापांचा नाश होतो. तसेच या तीर्थात स्नान करुन देवीचे भक्तीभावाने पुजन केल्यास सर्व मनोकामना पूर्ण होवून सर्व प्रकारच्या सिध्दी प्राप्त होतात असे या तीर्थाचे महत्व पद्मपुराणात सांगितले आहे. शिवालय तीर्थ नामक पुण्यकारक सरोवरात स्नान केल्याने ती अधिभौतिक, अध्यात्मिक, अधिदैविक या विविध तापातून मुक्त करते. या तीर्थात स्नान करुन जो कोणी पिंडश्राध्द करील तो पितरासहित जगदंबा स्वरुपाला पात्र होईल असे हे अखिल सौख्य देणारे तीर्थ स्नान आहे. या शिवाय तांबूलतीर्थ, काजलीतीर्थ, कोटीतीर्थ, इ.अनेक तीर्थ गडावर आहेत.



सतीचा कडा (शीत कडा) : तीर्थापासून थोड्याच अंतरावर सुमारे १२०० ते १५०० फूट खोलीचा तुटलेला कडा आहे. यालाच सतीचा कडा किंवा शीतकडा असे म्हणतात. अख्यायिका अशी की एका स्त्रीने असा नवस केला होता की, " जर मला मुलगा झाला तर मी गडावर बैलगाडी खेळवीन." तिला मुलगा झाला. तेंव्हा मुलासह बैलगाडीत बसून तिने गडावर खेळवली. या कड्यावरून ती बैलगाडीसह खाली पडली. मात्र ती स्त्री मुलासह व गाडीसह सुरक्षित राहीली अशी दंतकथा सांगीतली जाते. गडावर कालीका कुंडाजवळ दाजीबा महाराजांची समाधी आहे. ते देवीचे परमभक्त होते. ते देवीबरोबर बोलत होते असे सांगण्यात येते.

मार्कण्डेय दर्शन पुढील अंकात.

(क्रमशः)

धडा ५ वा.

# तुळस

लुकस दिवे.

गंगु वैतागली. गण्या सारखा रडत होता. कान खाजवीत होता. तो गंगूला कानाला हात लावू देईना. गंगू त्याच्या कानात पिन घालायचा प्रयत्न करी पण गण्या जोरजोरात बोंबलायला लागे. गंगूने गन्याला दोन रपाटे मारले व म्हणाली "गप्प बस कारट्या, एवढ्यानं ओरडायला का आभाळ कोसळलं तुझ्यावर ? गण्या आधिकच जोरात रडू लागला. तेंव्हा गंगू म्हणाली भाऊ दोन दिवस थोडी कळ काढ . शनिवारी तुला चिकाडीच्या बाजारला नेईल हो. तिथं तुझा कान मद्रासी डॉक्टरला दाखवू. एवढ्यात पोराचा बास व आजी आत आली. गण्या का रडतो म्हणून विचारले असता गंगूने त्याचा कान दुःखतो म्हणून सांगितले. आजी म्हणाली ये घेवून पोराला माझ्याकडं. आजीने त्याला गोंजारले व हळूच त्याचा कान पाहिला. आजीने गंगूला अंगणातून दहाबारा तुळसीचे पानं आणायला सांगितली. आजीने गण्याला मांडीवर झोपवले. गंगूने तोडून आणलेल्या पानांचा रस तिने गण्याच्या कानात पिळला. काही वेळाने गण्या आजीच्या मांडीवरच झोपला. दुसऱ्या दिवशी आजीने त्याच्या कानात परत रस टाकला. शनिवारपर्यंत कान ठिक झाला.



गण्या गंगूला म्हणाला " आये मी हो नाही येत डागटरकडे, माझा कान नाही हो दुःखत आता " आजी गंगूला म्हणाली " पोरी काखेत कळसा नि गावाला वळसा म्हणतात नाही का ? " गंगूने सासूबाईला तुळशीबद्दल विचारले असता आजीने तीला सविस्तर सांगितले.


तुळस हि एक पुजनीय वनस्पती आहे. हे झाड दोनतिन हात वाढते. ही वर्षभर जगणारी मऊ, केसाळ, व शाखायुक्त वनस्पती आहे. हिची पाने साधी, समोरासमोर, लांबटगोल, अखंड किंवा दातेरी व दोन्ही बाजूस लवदार असतात. फुले जांभळट किंवा किरीमिजी लहान फांद्याच्या व मुख्य खोडाच्या शेंड्यावर साध्या किंवा शाखायुक्त मंजिऱ्या येतात.



या मंजिऱ्यात तुळशीची बारीक बारीक फुले असतात. बी गोलसर, थोडे चापट, गुळगुळीत, फिकट भूरे किंवा तांबूस असते. सर्वांच्या अंगणात तुळस असायलाच हवी. सर्व लोकांना तुळस ही पवित्र असून ती मंदिराभोवती व घरी लावतात. अंगणात सुशोभित चौथरा करून त्यात तुळस लावतात. याला वृंदावन म्हणतात. सणावाराला तुळशीचे वृंदावन सारवून त्यावर आणि त्यापुढे रांगोळी काढतात. रोज सकाळी तुळशीला पाणी घालतात. तिन्ही सांजा तिच्यापुढे दिवा लावतात. तुळशीची पुजा व प्रदक्षिणा हा कित्येक स्त्रीयांचा नेमधर्म असतो हे तूला माहित असेलच.

पण तुळसीच्या पानांचे तेल जंतूनाशक व किटक नाशक आहे. तिची पाने कफ काढून टाकणारी असून त्याचा रस घाम आणणारा व पाळीच्या तापावर ऊपयुक्त आहे.

कानदुःखीवर कानात रसाचे थेंब टाकतात. नायटे व इतर चर्मरोगावर बाहेरून लावतात. वाळलेल्या पानाचे चुर्ण पडसे आले असता तपकिरी प्रमाणे ओढतात. बीया मुत्र विकारावर व जननेंद्रियांच्या काही विकारावर गुणकारी आहे. तुळशीच्या मुळाचा काढा तापात घाम आणण्यास चांगला आहे. पानांचा फांट ( थंड पाण्यात भिजवून काढलेला अर्क ) मुलांच्या पोटाच्या विकारावर ऊपयुक्त असतो. रान तुळशीच्या पानाचा काढा शुक्रजंतू (वीर्य) दुर्बलतेवर व परम्यावर देतात. तुळसीच्या मुळाच्या किंवा खोडाच्या मण्यांच्या माळा माळकरी गळ्यात घालतात. अशी ही सर्वकश ऊपयुक्त वनस्पती आहे.




चर्चाः आपल्या भागात तुळस आढळते का ?
कोणकोणत्या जातीची तुळस आपल्या भागात आढळते ?
धार्मिक कार्याव्यतिरीक्त तुळशीचा ऊपयोग आपण करतो का ?
तुळस ही बहूगुणी वनस्पती आहे हे पटते का ?
तुळस वनस्पतीवर साधकबाधक चर्चा करा.

घोषणाः लावा दारी अंगणी तुळस ।
तोच खरा घराचा कळस ।।

धडा ६ वा.

# ढोल वाजला

सखाराम गावीत

मे महिना सुरू झाला. शेताची पेरणी व नांगरणीला सुरवात झाली. आंबाठा गावाचे जवान मंडळींनी ढोल पावरी सजवली. रात्री ढोल वाजू लागला की नाचणाऱ्या जवानाचे पाय थरारायला लागायचे. तरूण एकत्र जमले की पायाला पावटा बांधून ठाकऱ्या नाचायला लागायचे. नाचता नाचता गाणे म्हणायचे-


" पडपाण्या पडपाण्या बाबा धरतारी सुकली रं ।
गुरढोरं, झाडंरान, नदिनाले तुजविन मुकली रं ।।

असे गाऊन रात्ररात्र नाचायचे. सणावाराला मुलंमुली ढोलपावरीवर एकत्र नाचायचे व खेळीमेळीने रहायचे.

पडपाण्या पडपाण्या बाबा धरणीला तहान लागली रं ।
आतुरली लालमाती भात, खुरसणी अन् नागली रं ।।

पाणी पडू लागल्यावर ढोल पावरी बंद ठेवून सर्वजण नांगरणी, वखरनी, पेरणी, आवनी इत्यादि कामात गुंगुन जातात व भात मळणी झाल्यावर पुन्हा ढोलपावरीला सुरवात होते. असे आहे आंबाठा गाव हौशी.

चर्चा: आपल्या गावात ढोलावर नाचतात का ?
कोणकोणती वाद्ये गावात आहेत ?
पूर्वी लोक एकत्र नाचत होते का ? आता एकत्र नाचतात का ?
चावडीवर ढोल वाजला । तरूणांनो नाचायला चला ।।



धडा ७ वा.

# सात बारा उतारा

दिवे एल.बी.

भारत हा शेतीप्रधान देश आहे. ७० टक्के जनता शेती व शेतीवर अधारीत उद्योगावर अवलंबून आहे. भिका मास्तर तालूक्यात नावाजलेले व एक आदर्श शिक्षक. तालूक्यातील वेगवेगळ्या गावात पाच सहा वर्ष ज्ञानदांनाचे कार्य करुन ते मुख्याध्यापक झाले. मास्तर शिस्तीचे प्रिय. मुख्याध्यापक झाल्यानंतर शाळेत खुपच सुधारणा केल्या. नवनविन उपक्रम राबवले. विद्यार्थ्यांचे हित जोपासले. शासनाने त्यांना आदर्श शिक्षकाचा पुरस्कार देवून सन्मानीत केले.



मास्तरांना दोन मुले व एक मुलगी. सर्व मुलांचे शिक्षण चांगले झाले. मास्तर मुळचेच हुषार तसे त्यांची मुले सुद्धा. दोन्ही मुले शेतकी पदवीधर तर मुलगी शिक्षिका. मुलीचे लग्न शिक्षकाशीच थाटामाटात लावून दिले. आता मास्तरांचे एकच वर्ष सेवेत राहीलेले. मास्तरांना एक चिंता होती ती म्हणजे मुलांचे शिक्षण करुनही त्यांना नोकरी नव्हती. त्यांच्या सोबतचे विद्यार्थी पैसे भरुन कामाला लागलेले. मुलीचे लग्न केल्याने नोकरीसाठी पैसे भरण्याची ताकद त्यांच्यात नव्हती. मुले निराश दिसायची मात्र वाचन घरात करायची व नोकरीसाठी अर्ज पाठवित असे.



एके दिवशी मास्तरांनी मुलांना बोलावले

मास्तरः मला सेवानिवृत व्हायला थोडेच दिवस राहिलेत. तुम्हाला अजूनही काम लागले नाही. साठ सत्तर हजार रुपये नोकरीसाठी प्रत्येकी भरण्यापेक्षा त्या पैशाची आपण जमिन खरेदी केली तर ?

धाकटाः जमिन घेतली तर चांगलेच पण ...

थोरलाः बाबा जमिन घ्यायला एवढे पैसे कुठून आणायचे ?

मास्तरः लवकरच मी निवृत होणार मग फंडाचे पैसे मिळतीलच ना ? त्या पैश्याचा योग्य उपयोग झाला तर मलाही आवडेल.

थोरलाः नोकरी करण्यापेक्षा स्वतःहाच्या भूमातेची सेवा करणेच आम्हाला जास्त आवडेल.

धाकटाः त्याशिवाय आपल्या शेतात नविन नविन प्रयोगही करायला मिळतील.

दोघा भावांना वडिलांचे म्हणणे पटले व ते तिघेही कामाला लागले. शेती पाहीली व तीचा सहा महिन्याच्या आतील ७/१२ पडताळून पाहिला. सदर जमिन विकत घेता येते का ? ती 'नविन शर्त ' आहे का ? तिच्यावर सरकारी कर्ज, बँकेचे कर्ज, तगाई इ. आहे का ? ती वादाची जमिन आहे का ? ती तुकडे बंदि कायद्यात लागू होते का ?

तीचे कब्जेदार कोणकोण आहेत ? इतर हक्क कोणाकोणाचे आहेत ? इत्यादि बाबींची तपासणी करुन त्यांनी जमिन खरेदी केली .सात बारा म्हणजे काय ? त्याचे महत्व काय ? त्यात काय लिहिलेले असते ? त्याला सात बाराचा उतारा का म्हणतात ?



सात बाराचा उतारा म्हणजे जमिनीचा आरसा. याचे प्रमुख कारण म्हणजे जमिनीवर प्रत्यक्ष न जाता जमिनीबाबतचा सर्व तपशील आपणास ७/१२ वाचून कळू शकतो. ७/१२ वरून आपणास जमिनीचा भूमापण क्रमांक, गावाचे नावं, त्या जमिनीची भूतकाळ व वर्तमान काळाची मालकी या विषयीची माहिती मिळू शकते. तलाठी जमिनीच्या संदर्भात वेगवेगळ्या नोंदवह्या ठेवित असतो. या नोंदनी वह्यांना (रजिष्टर) वेगवेगळे अनुक्रमांक दिलेले आहेत. यालाच गाव नमुना म्हणतात. असा गावाचा नमुना नंबर सात व गावाचा नमुना नंबर बारा हे एकत्र करून त्यातील माहिती ७/१२ च्या रूपात दिली जाते. सबब ७/१२ चा उतारा म्हणजे गावाचा नमुना नंबर ७ व नमुना नंबर १२ या मधिल उतारा (एक्स्ट्रॅक्ट) असतो. म्हणून त्याला ७/१२ चा उतारा म्हणतात. तसेच ७/१२ उताऱ्यात गावाचा नमुना नं ७ अ मधिल माहितीही समाविष्ट असते.

७/१२ उताऱ्याचे दोन मुख्य भाग असतात. ते म्हणजे गावाचा नमुना नं ७ व १२ . नमुना नंबर ७ मध्ये गावाचे नाव, जमिनीचा सर्वेनंबर अथवा गट क्रमांक जमिनीचे स्थानिक नाव, मालकाचे नाव, इ. लिहिलेले असते. जमिन ज्या गावात आहे त्या गावाचे नाव, ते ज्या तालुक्यात आहे त्या तालुक्याचे नाव, या गोष्टी उताऱ्यावर सहज नजर टाकताक्षणी कळतात. जमिनीची गट क्रमांक किंवा सर्वे नंबरही कळतो.आपणास विकत घ्यायचा जमिनीचाच हा उतारा आहे की नाही हे यावरून चटकन लक्षात येते. ७/१२ उताऱ्याच्या उजव्या बाजूला 'इतर हक्क' असे सदर असते. त्यामध्ये जमिनीवर असलेले इतरांचे हक्क व इतर गोष्टी लिहिलेल्या असतात.

७/१२ उताऱ्यावर जमिनीचे एकूण क्षेत्र लिहिलेले असते. ते काही ठिकाणी एकर व गुंठे या मापात तर काही टिकाणी हेक्टर व आर या मापात लिहिलेले असतात. काही वेळा आपण संपूर्ण जमिन विकत न घेता त्यातील काही भागच विकत घेतो. अशा भागाला ' तुकडा ' असे म्हणतात. जमिनीचा तुकडा आपण विकत घेत असलो तर त्या जमिनीस तुकडे बंदी कायदा लागू होतो का ते पहावे ? जर होत असेल तर इतर हक्क या सदरात ' तुकडा ' वा ' तुकडेबंदी ' असा शेरा असतो. जमिनीस तुकडेबंदी कायदा लागू असेल तर अशी जमिन तुकडे पाडून विकता येत नाही. ७/१२ मध्ये जमिनीच्या क्षेत्रामध्ये लावणी लायक क्षेत्र किती व त्यापैकी जिरायत, बागायत, व भात शेती यांचे क्षेत्र दाखवले असते. तसेच संपूर्ण जमिनीपैकी पोटखराबा म्हणजे लागवडीलायक नसलेली जमिन किती हे दर्शवलेले असते. ७/१२ मध्ये याखेरीज काय असते ते पुढील अंकात पाहू.


धडा ८ वा

# डोकं चालावा


लुकस दिवे

आपणास बारा खडे दिलेत. त्या खड्यापासून सहा सरळ रेषा काढा . मात्र एका रेषेत चारच खडे असावेत. बारा खड्या पेक्षा जास्त खडे वापरू नयेत.


यातुन आपणास आपल्या समाज रचनेचे कोणते चित्र दिसते ?
आपली समाज रचना बदलण्यासाठी आपण काय केले पाहिजे ?




मुठभर लोकांच्या हाती सत्ता
गरीब अधिक गरीब होतोय.




गरीबांच्या हाती सत्तांतर



संकल्पना :

आर्थिक, सामाजिक परिस्थितीच परिवर्तन होउन तळागाळातील लोकांच्या हाती सत्ता यावी

धडा ९ वा.

## दस्त

माघाडे वाय. जे.


दस्त या शब्दाचा उगम उर्दु भाषातून झाला आहे. थोडक्यात सारांश रुपाने दस्त म्हणजे सही केलेला कागद होय. एखाद्या कागदावर काही जे लिहीले ते मला मान्य आहे या संबंधी मान्यता दर्शक खूण म्हणून लिहिलेल्या मजकुरा खाली सही केलेल्या कागदाला महत्व प्राप्त होते. तसेच या कागदावर एकापेक्षा जास्त लोकांच्या साक्षिदार म्हणून सही केल्या असल्यास त्याला जास्त महत्व प्राप्त होते.

आपण रोजच्या व्यवहारात पत्र लिहीतो, या पत्रातील अनेक पत्रे प्रसंगानुसार न्यायालयीन पुरावा म्हणून सादर करावे लागतात व त्यांना महत्व प्राप्त होते. उदा. खरेदी विक्रीचे व्यवहार.

दस्त या शब्दाने आपणास नोंदणी केलेला कागदपत्र असा अर्थ अभिप्रेत आहे. या कागदाची नेहमीच नोंदणी केली पाहिजे असा नाही, तर इतर आधारभूत कागदपत्र सुद्धा दस्त म्हणून पाहीले जातात.

सामान्य मानसाच्या जिवनात केंव्हाना केंव्हा मालाची खरेदी विक्री, स्थावर व जंगम मालमत्तेची देवाण घेवाण करावी लागते. तसेच देणगी, वाटणी, दत्तक मुखत्यार पत्र असे व्यवहार करावे लागतात. त्यातील काही व्यवहार साध्या स्वरुपाचे असतात. त्याची नोंद केली नाही तरी चालते. पण असे काही व्यवहार असतात त्याची नोंद करावीच लागते. त्यासाठी ठराविक रकमेचा स्टॅम्प सरकारकडून उतरविलेला असतो. व त्याची सरकारी अधिकाऱ्यांकडून नोंदणी केली जाते. त्यासाठी ठराविक फी नोंदणी आधिकाऱ्याला द्यावी लागते व त्याला आपण दस्त झाला असे म्हणतो. असे दस्त स्थावर मालमत्तेची खरेदी विक्री, गहाण खतवर खरेदी विक्री अशा व्यवहारात केले जातात.

दस्त ऐवजाचे म्हणजे कागदपत्र लेखाचे सर्व काम वकीला मार्फत केले पाहीजे अशी सर्वसामान्य माणसाची समजूत आहे. पण ती बरोबर नाही. दस्त ऐवजाचे कागदपत्र कोणीही स्वतः करू शकतो किंवा करवून घेवू शकतो. ते करीत असतांना कोणावर विसंबून राहू नये तर पूर्ण विचार करून व तज्ञ माणसांबरोबर चर्चा करून करावे. कारण दस्त पूर्ण झाल्यावर मला त्या बाबतीत कायदा माहीत नव्हता असे म्हणून कायदेशीर जबाबदारीतून सुटका होवू शकत नाही.




धडा १० वा.

# सहकार

दारोळे ए.डी.

नाशिक जिल्ह्यातील इगतपूरी, दिंडोरी आणि पेठ तालूक्यात पावसाचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे याच भागात धरणे जास्त बांधलेली आपण पहातो. ज्या ज्या भागात धरणे आहेत तो भाग वाटी प्रमाणे खोल आहे. या धरणांमधून निघालेले पाट सुध्दा (डावा उजवा कालवा) खोलगट भागातूनच वाहतात. या मुळे जमिनीला पाणी देणे अवघड जाते किंवा खर्चामुळे शक्य होत नाही. म्हणून शेतकरी लोक एकत्र येवून लिफ्ट करतात. त्यामुळे एकरी खर्च कमी येतो. तसेच परत फेड करणे सोपे जाते. एकाच वेळी अनेक लोकांची जमिन ओलिताखाली आल्यामुळे जनावरांचा बंदोबस्त होतो. राखणीचा प्रश्न मिटतो. माल जास्त उत्पन्न होत असल्याने वाहतूक करण्यासाठी स्वतंत्र गाडीची व्यवस्था करता येते. माल मार्केटला नेता येतो. हे सर्व फायदे पाहून कांही लोकांनी लिफ्ट करण्याचे ठरविले.



लिफ्ट करण्यासाटी १८ वर्षापर्यंत पाण्याची परवानगी काढली. ए-१ फॉर्म भरुन विजेचे कनेक्शन मिळविले. बँकेतून कर्ज मिळविण्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे जमवली व बँकेमध्ये प्रकरण केले. कृषी अधिकारी व बँक मॅनेजर यांनी जागेची पहाणी केली.

सामुदायीक लिफ्ट असल्यामुळे कर्ज प्रकरण लगेचच मंजूर झाले. हा हा म्हणता लिफ्ट चालू झाले. भाजीपाला चांगला पिकू लागला. मालाला भाव चांगला असल्याने एक दोन वर्ष हप्ते वेळेवर भरता आले. ३ऱ्या व ४ थ्या वर्षी मात्र बाजारभाव उतरले. केलेल्या मालाचा खर्च सुद्धा निघेनासा झाला. या मुळे काही लोकांना हप्ते सुध्दा भरणे कठीन झाले. वसुली साठी बँकेचा तगादा चालूच होता. व्याज आणि मुद्दल वाढू लागले. काय करावे समजेना. काही शेतकरी कर्ज भरून निल झाले होते. शेवटी सर्वांनी एकत्र बैठक घेवून बँकेचे कर्ज भरण्याचे ठरवले. ज्या शेतकऱ्यांवर कर्ज नव्हते त्यांनी ज्यांच्यावर कर्ज होते त्यांचे कर्ज फेडले व बँकेचे कर्ज फेडले. अशा प्रकारे सर्वांनी सहकार्य करून लिफ्टचे बँकेमधिल कर्ज फेडले. सर्वांच्या मुखावर हसू उजळले. या पुढे असेच कठीण प्रसंगी सर्वांनी एकमेकांना मदत करण्याचे ठरविले.

चर्चाः

आपण आपल्या गावात एकमेकांना अडीअडचणीला मदत करतो का ?

आपल्या गावात सार्वजनिक कोणती कामे सहकार्याने करू शकतो ?

घोषणाः

१) एकमेका सहकार्य करू अवघे धरू सुपंथ ।

२) सहकाराने गावाची प्रगती करू ।



धडा ११ वा.

# घुबड

दारोळे ए.डी.

संध्याकाळची वेळ होती. नुकताच सूर्य मावळला होता. थोडा उजेड व अंधाराचे सावट चहुकडे पसरले होते. शाळा सुटून लगबगीने घराकडे चालालो होतो. घर गावापासून थोडे बाजूलाच होते. रस्त्यावर मोठे चिंचेचे झाड होते. या झाडावर भूत राहते आमावस्या व पौर्णिमेला दिसते असे लोक चर्चा करतांना मी अनेकदा ऐकले होते. तसेच या झाडावर घुबडे रहातात हे देखिल ऐकले होते. एकटे मन विचारांचा डोंगर पोखरते असे म्हणतात. माझ्या मनात असंख्य विचारांचे वादळ उठले होते.




बराच रस्ता चालून आलो असता लांबून चिंचेचे झाड मला दिसू लागले. छे छे दिसू लागले नव्हे तर विक्राळ राक्षसा सारखे भासू लागले. जणू मला जिभाळ्या दाखवून विकट हास्य करत आहे असे भासू लागले. देव तारी त्यास कोण मारी असे मनात म्हणून देवाचे नाव घेत घेत पुढे चालत राहिलो. चिंचेजवळ आल्यावर झाडाच्या खोडावर नजर गेली. फांदीवर दोन घुबडं जवळ जवळ बसलेली दिसली. मी अतिशय घाबरलो. पुढे जायला मन होईना. घुबड काही हटेना काय करावं ? साऱ्या अंगाला दरदरून घाम फुटला

देवाच नाव घेवून थोडे साहस करुन एक दगड उचलला व घुबडाच्या दिशेने भिरकावला. तो दगड त्यांच्या अगदीच जवळून गेला पण परिणाम काहीच झाला नाही. घुबडानी आपली गोलगोल मान वर खाली , उजवीकडे डावीकडे फिरवली. मी आधिकच घाबरलो. घुबड हे अपशकुनी असते, वाईट असते हे ऐकलेले शब्द कानात घोंगावू लागले. घुबडाला दगड मारू नये कारण मारलेला दगड ते चोंचीमध्ये धरून खडकावर घासते. दगड जसजसा बारीक होतो तसतसा माणसाचा अंत जवळ येतो. तसेच रात्रीच्या वेळी घुबड जर ओरडत असेल तर घरात रडणाऱ्या बाळाचा आवाज एकत्र येवू देवू नये.



आवाज एकत्र आला तर मुल मरते. घुबड घर बांधण्यासाठी चिंध्यांचा वापर करते अशावेळी बाळ व बाळंतीनीचे कपडे घुबडाने नेवू नये. म्हणून रात्रीचे असे कपडे बाहेर सुकायला टाकत नाहीत. हे कपडे घुबडाने नेल्यास बाळ व त्याची आई दोघेही बारीक होवून मरतात. हे सर्व आठवत असतांनाच माझ्या मनातील अंतर्मनाने एकदम जोर केला व हा सर्व गैरसमज आहे, ही अंधश्रद्धा आहे असे मला वारंवार सांगू लागले. आपण ऐकले हे सर्व खरे आहे का ?



असे सांगण्यामागे काय कारणे असावीत याचा मी शोध घेवू लागलो. घुबडाची चोंच बारीक असते मग एवढा मोठा दगड ते कसे चोंचीत धरणार ? मग तो दगड घासण्याची गोष्ट निराळीच. तसेच बाळाचा व घुबडाचा आवाज एकत्र येवू देवू नये. घुबड हे रात्रीचे आपले अन्न शोधत असते. तसेच आपल्या जातभाईबरोबर ते सांकेतिक भाषेत परिसंवाद साधत असते. याचा अर्थ ते रात्रीचे एकमेकांशी बोलणारच.पण रात्रीच्या निरव शांततेत ते आपणास भेसूर ओरडतांना भासते. रात्री बालकाचा आवाज त्याच्या आवाजाशी मिळू देवू नये याचा अर्थ रात्री आपल्या बाळाला दिर्घकाळ पर्यंत रडू देवू नये. रात्री बाळ रडण्याची अनेक कारणे आहेत पैकी बाळाने बिछाना ओला केला असेल, बाळाला भूक लागली असेल, किंवा त्याला मच्छर वा मुंगी चावली असेल इत्यादी . बाळाच्या आईने जागसुद झोपावे व बाळाला रडण्याने जास्त कष्ट पडू नये हा उद्देश असावा. अशी कारणे शोधताशोधता मी घराजवळ येवून पोहचलो. आता मनातील भिती पुर्ण नाहीशी झाली होती. ज्या घुबडामुळे मी घाबरलो त्यांच्या विषयी आधिक माहीती मिळविण्याचा मी प्रयत्न करू लागलो.

घुबड हा जगभर आढळणारा पक्षी आहे. हा घू घू असा आवाज करतो. याच्या १३५ जाती असून अनेक उपजाती आहेत. भारतात त्यापैकी ८ते १० जाती आढळतात. हा एक रात्री फिरणारा मांसहारी पक्षी आहे. त्याचा चेहरा थबकडा असून डोळ्याभोवती वाटोळ्या खोलगट तबकडी सारखे वलय असते. आणि त्याच्या कंठावर पिसांची झालर असते. डोके मोठे असते. पिसे मऊ असल्याने ऊडतांना आवाज येत नाही. त्याचे पाय आखूड व पिसांनी झाकलेले असतात. नखे वाकडी तिक्ष्ण व बळकट असतात. डोळे मोठे व पुढच्या बाजूला असतात. चेहऱ्यावरील वलयाच्या काठाच्या लगेच मागे कान असून ते आकाराने सारखे नसतात. खोलगट वलयाचा उपयोग प्रकाश व ध्वनी गोळाकरण्यासाठी होतो.



लहान घुबडे किडे उंदीर व पक्षी खातात. मोठी घुबडे ससे,घुशी,पक्षी,साप इत्यादीवर उपजीविका करतात. काही घुबडे मासे, बेडूक व खेकडेखातात. लहान प्राणी ते अखंड गिळतात व अन्नाचे पचन झाल्यावर हाडे पिसे केस व न पचलेले पदार्थ लहान गोळे करून तोंडाबाहेर टाकते. घरे, निरुपयोगी जुनाट इमारती, पडक्या भिंतीतील पोकळ्या, झाडाच्या ढोल्या इ.ठिकाणी ते घरटी बणवतात. मादी एका वेळी ४ते ७ अंडी घालते. साळुकी एवढ्या दिसणाऱ्या घुबडाला पिंगळा म्हणतात. पुराणात त्याला लक्ष्मीचे वाहन माणले.

चर्चाः

घुबडाबद्दल तुमची कल्पना काय आहे ?

धडा १२ वा.

# निंबोळी पेंड

माघाडे वाय.जे.

पावसाळा सुरू झाला. करंजवन गावात औत जुंपणी झाली. गावा बरोबरच चंदरनेसुद्धा भाताचे (उत) टाकले. चंदर तसा गरिब शेतकरी पण भात पिकाच्या बाबतीत गावात नंबर एक. गावातील लोक त्याचे भाताच्या पिकासाठी अनुकरण करायचे. भाताची रोपे लवकर येण्यासाठी व चांगली वाढण्यासाठी तो युरिया खताचा वापर करायचा. सरकारने या वर्षी युरियाचे भाव एकदम वाढविल्यामुळे चंदर चिंतातुर झाला. यंदा आपल्याला भाताचे पिक चांगले घेता येणार नाही म्हणून काळजी करू लागला. एक दिवस बेनारचे माळी साहेब चंदरच्या मळ्यात आले.

चंदरः या बसा साहेब.


साहेबः अरे असा नाराज होवून काय बसलास ?

चंदरः साहेब सरकारने युरियाचे भाव वाढवून चांगलेच केले नही का ? आता आम्ही ही महाग खते कशी घ्यायची व कशी पिके जगवायची ?

साहेबः अरे युरिया पेक्षा स्वस्त व चांगली खते बाजारात मिळतात व घरीही बनवता येतात. त्यामुळे पिक तर चांगले येतेच पण जमिनही सुधारते. (हे ऐकूण चंदरचा चेहरा एकदम खुलला.)

चंदरः साहेब तुम्ही देवासारखे पावलात बघा. आता आम्हाला त्या प्रकारच्या खताबद्दल माहिती द्या बघू.

साहेबः जसे युरियामध्ये नत्राचे प्रमाण असते तसेच नत्र पेंडी युक्त खतामध्ये असते. निंबोळी पेंडीबद्दल तुम्ही एकून असालच. कडूनिंबाच्या झाडांना जून ते सप्टेंबर पर्यंत पिवळी फळे येतात. पिकल्यावर ती आपोआप गळून पडतात. १०० किलो निंबोळ्यापासून २० किलो तेल व ८० किलो पेंड तयार होते. या पेंडीत नत्राचे प्रमाण ५.२ टक्के असते.



भाताच्या पिकासाठी चिखलनिच्या वेळी जर निंबोळी पेंडीचा वापर केला तर उप्पादन चांगले येते. पिकाची काळोखी टिकून रहाते. भाताची फुट चांगली होते व काडी जोमदार वाढते.निंबोळी पेडीचे अनेक फायदे आहेत.

१) जमिनीची पोत सुधारते.

२) भातात खेकडे किंवा किरवे असतील तर त्यांचा नाश होतो.

३) युरिया या रासायनिक खतात निंबोळी पेंड मिश्रन करून वापरली तर हवेत उडून जाणारा व पाण्याबरोबर वाहून जाणारे नत्र पिकाला हळूहळू पुरविले जाते.

४) पिकावरील किड व अळी यांचे नियंत्रण होते. भाजीपाल्यासारख्या पिकांना निंबोळी पेंड अतिशय उपयुक्त आहे.

५) निंबोळीचे तेल पाण्यात मिसळून पिकावर फवारणी करता येते. फवारणीसाठी निंबाच्या पानांचा रस सुद्धा उपयुक्त असतो.

६) निंबाच्या झाडाचा पाला धान्यात ठेवला तर धान्याला किड लागत नाही.

निंबोळीच्या पेंडीची माहीती ऐकून चंदर एकदम खुष झाला.

चंदरः साहेब निंबोळी पेंड ही तर पिकांसाठी संजीवनीच आहे.

साहेबः बरोबर बोललास बघ. निंबोळीच्या पेंडीसारखी एरंड, मोह, करंज,
या सारख्या पेंडीदेखिल वापरता येतात. काही पेंडी आपण
घरच्याघरीच तयार करु शकतो व आपला खर्च वाचवू शकतो.

चंदरः साहेब मी या वर्षी युरिया तर वापरणारच नाही पण निंबोळीच्या
पेंड वापरून पिकही जावू देणार नाही. तसेच गरज पडल्यास
निंबोळीच तेल पाण्यात टाकूनही फवारणार व काहीही करुन
पहिला नंबर जावू देणार नाही.

माळी साहेब व चंदर दोघेही जोरजोरात हसतात. चंदर स्वयपाकघराकडे पहात बायकोला म्हणतो 'अग सकु दोन कप गरमागरम चहा आण पाहू ' चंदरची बायको चहा घेवून येते. दोघे आनंदाने चहा पितात.

साहेबः (चहा पितापिता) छान गरमागरम कडक चहा मिळाला.

चंदरः (बायकोला उद्देशुन) अग ऐकलं का साहेब काय म्हणतात ते, म्हणे
छान चहा मिळाला.

सकुः साहेब चहात निंबोळीची पेंड टाकली चहापावडर (युरिया) महाग
झालाय ना आता.

तिघेही मोठमोठ्याने हसतात. साहेब बाहेर येत असता चंदर म्हणतो साहेब परत या भेटायला.

साहेबः तुझा एक नंबर आला की परत येईल ना निंबोळीचा चहा प्यायला

पुन्हा तिघेही हसतात व साहेब निघून जातात.



धडा १३ वा.

# यात्रा

दारोळे ए.डी.

मंगळवारचा दिवस होता. मिर्झापूरचे लोक माळवाडीला जायला सकाळपासून तयारी करीत होते. बारक्या व हनम्या सुद्धा तयारीला लागले होते.ते सकाळी ओढ्यावर गेले वकपडे धुवून आंघोळी केल्या. कपड्याला निळ लावली व धोब्याकडून इस्तरी मारुन घेतली. संध्याकाळी माळवाडीला काळूबाळूचा तमाशा होता. तमाशा पहायला वेळेवर गेले पाहिजे. रस्ता तसा कच्चाच होता पण नेहमीचा सरावातला होता. दोन्ही बाजूला दाट झाडी होती. अंधेरी रात्र असल्याने रस्ता अधिकच भयान भासे. दोघे सायकलवर स्वार होवून हळूहळू बोलत माळवाडीला निघाले.

काही अंतर गेल्यावर अचानक हनम्या बोलायचा थांबला व जोरजोरात सायकल हाकू लागला. बारक्याला वाटले तमाशाला वेळेवर पोहचायला हवे म्हणून हनम्याने वेग वाढवला असेल. बारक्यापण जोरात चालवू लागला. हे पाहून हनम्याने आनखीच जोर वाढवला. वारा जोराने वहात होता तसेच वाऱ्याबरोबर झाडाची पाने टपटप खाली पडत होती. दोघेही उलट्या वाऱ्यात सायकल जोरात चालवत असल्याने दमुन गेले. दमल्यामुळे स्वास जोरत निघत होता. वाऱ्याच्या विरूद्ध सायकल चालत असल्याने सु सु आवाज येत होता. ओढा ओलांडून दोघेही नऊच्या सुमारास माळवाडीला पोहचले. तमाशा सुरु व्हायला एक तास बाकी होता. बारक्या हनम्याला म्हणाला हळूहळू आलो असतो तर बरं झाल असतं ? तुच घाई केलीस.

हनम्या : म्हंजे तुला काय ठावूक न्हवं ?

बारक्याः मला समजलं नाही बुवा.

हनम्याः आरं त्या मोठ्या वडाजवळ भूत निघतं ते माणसाच्या मागं पळतं . ते शिट्या वाजवत मागं पळतं. तू येतांना शिटीचा आवाज ऐकला नाही ?


बारक्याः अरे मी तर काहीच आवाज ऐकला नाही.

हनम्याः मग तू का बर सायकल जोरात चालवलीस ?

बारक्याः आरं हनम्या तू जोरात चालला मला वाटलं टाईम झाला आसल म्हणून मी पण सायकल जोरात दामटली.

हनम्याः म्हंजे तुझा भूतावर विस्वास नाही व तू मुळीच घाबरला नाहीस.मग तो शिटी वाजवल्याचा आवाज होता तो कोणाचा

बारक्याः अरे जोरात सायकल चालवल्यावर दम लागतो त्यामुळे नाकातुन हवा जोरात आतबाहेर फेकली जाते. तिचा आवाज शिटी सारखा येतो. व भूत मागे पळत नव्हत तर पाला पाचोळा सायकलमुळे व हवे मुळे उडत होता नि त्याचा आवाज येत होता. तुला वाटलं भूतच मागे लागलय. आरं काहीतरीच बोलू नकोस. सध्या यांत्रिक युग आलय व लाईटमुळे भूतबीत राहीली नाहीत. हे सारे आपले मनाचे विचार असतात. भूतबीत काही नाही रे बाबा. हा विचार मनातून काढून टाक.



चर्चाः

- भूतांवर तुमचा विश्वास आहे का ?
- अशी एखादी ऐकलेली घटणा सांगा.
- तुम्ही भूत पाहिलय का ?

घोषणाः

आपल्या मनातील भूत काढा ।

विज्ञानाशी नाते जोडा ।।

धडा १४ वा.

# कंपोष्ट खत

दारोळे ए.डी.

निशांत भाग ५ मध्ये कंपोष्ट खत बनविण्याची ढीग पद्धत आपण पाहिली. या पाठात खड्डापद्धत आपण पाहू. आपणास याची खरोखर गरज आहे का असा प्रश्न पडेल. होय कंपोष्ट खताची खरोखरच गरज आहे कारण शेणखतात शेण आणि मुत्र या मध्ये नत्र व पालाश सारख्या प्रमाणात आहेत. याचा नाश होवू नये म्हणून हाताळणी व साठवण योग्यप्रकारे करणे गरजेचे आहे.




खड्डा पद्धतः यामध्ये खड्ड्याची लांबी जनावरांची संख्या किती, हंगामात किती शेण मिळेल यावर अवलंबून असली तरी खड्डा २० ते २५ फूट लांब ५ते ६ फूट रूंद व ३ते ३.५ फूट खोलीचा चर खोदावा. एकच लांब खड्डा घेण्याऐवजी दोन किंवा आधिक लहान लहान खड्डे घ्यावेत. खड्डा भरतांना खालचा थर जनावरांनी न खाल्लेली सुकी ओली वैरण पसरून ठेवावी. खड्ड्यात टाकण्यापूर्वी रात्रभर जनावरांच्या खाली वैरण पसरून ठेवावी. म्हणजे वाया जाणारे शेण व मुत्र ती शोषुन घेते. एका जनावरापासून दोन ते अडीज किलो नत्र शोषले जाते. वैरण नसेल तर कोरडी माती गोठ्यात पसरून ठेवावी. सकाळी सर्व माती गोळा करून खड्ड्यात सारखी पसरावी. शक्य झाल्यास पाणी शिंपडावे. त्याच प्रमाणे टाकावू पदार्थ, पाने, फांद्या, गवत, राख वगैरे शेण मूत्राबरोबर एकत्र मिसळून खडड्यात टाकावे.

खड्डा भरतांना जमिनीवर एक ते दान फुट येईल एवढा भरावा. साधारणतः तिन महिण्यात एक खड्डा भरतो. एक खड्डा भरल्यानंतर दुसरा खड्डा भरावा. खड्ड्याची जागा निवडतांना खोलगट भागात खड्डा घेवू नये. म्हणजे त्यात पाणी साचणार नाही.

एका जनावरापासून एका वर्षात ५ ते ६ टन ( १० ते १२ बैलगाड्या) शेणखत मिळते. शेणखतात नत्र ०.५ टक्के, स्फुरद ०.२ टक्के, आणि पालाश ०.५ टक्के एवढे प्रमाण आढळते.

चर्चाः

१) शेणखताचे खड्डे आपल्यापैकी कोणाकोणाकडे आहेत ?

२) शेणखताचा वापर आपल्या शेतात कोणकोण करतो ?

३) शेणखत कोणकोण विकतात ? का ?

४) शेणखत गावातच विकता किंवा बाहेरगावी ?

५) गावाचे शेणखत गावातच शेतीला वापरले तर काय फायदे होतील ?

घोषणाः

१) खतात खत शेणखत ।
पिके येतील दणकट ।।

२) वाढवा आपली मिळकत ।
वापरून शेतात शेणखत ।।



# पद्य विभागः

१

# दारूची बाटली

लुकस दिवे.

जेंव्हा दारूची बाटली मी घेतली
माझ्या संसाराला संक्रांत कशी लागली  ।।धृ.।।
संतावाणी होते माझे मायबाप
वाहे सुखाचा झरा तेथे आपोआप
पण वाईटाची संगत मला जडली ...  ।।१.।।
दारू पायी माझी फार वाढली उधारी
पोरंबाळं दारोदार मागे भाकरी
घरादाराला माझ्या दारू नडली ...  ।।२.।।
ऐका तरूणांनो जरा विचार करा
आताच दारूचा त्याग करा
नव जिवन मिळेल जर दारू सोडली
माझ्या संसाराची संक्रांत अशी टळली




२

# पाणी अडवायचं

भगरे व्ही.एम्.



नाही घडलं ना घडणार ते आपण घडवायचं
बांध टाकुनी पाणी अडवायचं ।।धृ.।।
ओसाड पडली आपली भूमी
आली संधी ही रं नामी
या गावाला या रानाचं चित्र हे बदलायचं ।।१.।।
ओढे नाले आपण अडवू
एकजुट हि आपण घडवू
गाई म्हशीच दुध हे वाढवायचं ।।२.।।
विस रूपये महिण्याला भरा
मार्ग बचतीचा हा खरा
या गरीबीला आपण हटवायचं ।।३.।।
महिलांनो तुम्ही जागे व्हा
घरी नको परूचा ठेवा
या जुगारी नवऱ्याला कायद्यान हटवायचं ।।४.।।



२

# बंधूप्रिती

लुकस दिवे.

सहकार्याने एकामेकाच्या जग आपण हलवू
आपली हि धरती बंधूप्रितीने फुलवू ।।धृ.।।
नकोत युद्धे नको लढाई
मारू नका फालतू बढाई
प्रेमभाव साऱ्या जगात आपण पसरवू ।।१.।।
नकोत द्वेष नको राग राग
भडकेल सारी आग ही आग
माणूसकीच भक्कम नातं जगाला आपण दाखवू ।।२.।।
भारतीय संस्कृती जपते अहिंसा
होते कशी पहा जगात हिंसा
राष्ट्रशांतीचे प्रतीक साऱ्या जगाला आपण दाखवू ।।३.।।




४

# पाणी जिरवायचं

पोपट कराटे

ऐका हो गावकरी देवून ध्यान । पाणलोटाची किमया घ्या ऐकूण ।
जमिन धूवून गेली धूपेन । काम एकीन करायच ।
आता अडवून माती पाणी शेतात जिरवायचं ।।धृ.।।
डोंगरावरती लावूया झाडं । औषधि मूळ फळ लाकूड ।
करूया आधि कुऱ्हाड बंदी । जंगल गावान वाढवायच ।।१.।।
वाचवूया उतार शेत जमिन । कटूर बांध आडवा घालून ।
करूया आधि चराई बंदी । पाणी सांडव्यात वळवायच ।।२.।।
निसर्गाशी तुम्ही जुळवा नाती । विकासाची मशाल घेवून हाती ।
तरूण सारे जागे व्हा रे । नव्या पिढीला घडवायचं ।।३.।।
घराघरातुन घेवून शिक्षण ।ज्ञानाने सुखी होई जीवन ।
धरूया ध्यास करूया ऱ्हास । अंधश्रध्देला पळवायचं ।।४.।।
घळी ओघळीचे वाहे गढुळ पाणी । अडवू तयाला दगडी बांधानी ।
शेताच्या वाटं काढूनी पाट । पाणी शेतात वळवायचं ।।५.।।




५


# डोंगराच्या आड

भगरे व्ही.एम.

सगळीकडे दिसते उजाड, बघाया मिळेना हिरवं झाडं
का रे दिलंस बापा मला या डोंगराच्या आड ।।
पाणलोट कार्यक्रम चाललाय तिथं छान
होईल समदं शिवार आता, चार वर्षात हिरवंगार .
इचार हाच करून लेकी, दिलं तुला डोंगराच्या आडं ।।



बाया बापड्या राबतात दिसभर, पोटापुरती मिळेना भाकर
का ग दिलंस आई मला या डोंगराच्या आड ।।
अडवूनी माती जिरवून पाणी, श्रमदानाला जाल सारे
महीलांची एकी होईल भक्कम, बचत गटात पडेल रक्कम
इचार तुझा हुशारीचा करून दिलंय तुला डोंगराच्या आड ।।



## शब्द कोडं

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ८ | ९ | | | १० | | ११ |
| १२ | १३ | | १४ | १५ | १६ | १७ |
| १८ | १९ | २० | | | २१ | २२ |
| | २३ | | २४ | २५ | २६ | |
| २७ | | २८ | २९ | ३० | | ३१ |
| ३२ | ३३ | ३४ | ३५ | | ३६ | ३७ |

### आडवे

१. केसरीचे संस्थापक

८. जकात, टॅक्स

१२. सारखं, समान

१४. प्राप्त, आत्मसात

१८. सोनुल्या, छकुल्या

२१. बोहल्यावर निघालेला

२४. मागे येणे, फिरूण येणे

२८. जोडे, चपला

३२. बडबड करणे, वायफळ बोलणे

३६. मेनबत्तीच्या आतील दोरा, हवा

### उभे

१. मराठी प्रसिद्ध दैनीक पत्र

२. सांस्कृतीक कार्यक्रम पहाण्याचा उद्देश

५. जमिन खोदण्याचे अवजार

७. शांतीचे प्रतिक असलेला पक्षी

१६. दुभत्या जणावरांचे प्रमुख अन्न

२४. निशांत, पक्षी झोपेतुन उठण्याची वेळ

२५. युध्द भूमि, धावणे (इंग्रजी)

२७. होडी, नौका

२८. संधी, इंग्रजीतुन काढलेला आनंदोद्‌गार

३१. कोकणातील मुख्य अन्न